# महात्मा गांधी यांचे पत्रकार, संपादक आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य विषयक विचार

**विशाल बाजीराव पुजारी**, मास कम्युनिकेशन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

……………………………………………………………………………………………......

**प्रस्तावना**

'महात्मा गांधी यांचे पत्रकार, संपादक, वर्तमानपत्रे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य विषयक विचार' याविषयीच्या संशोधनामधून महात्मा गांधीजींच्या पत्रकारितेचा अभ्यास केला आहे. गांधीजींचे व्यक्तिमत्त्व हे बहुआयामी होते. जीवनाचे असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यावर गांधीजींनी विचार केला नसेल आणि त्यावर आपली छाप सोडली नसेल. गांधीजींनी त्यांच्या आगामी मिशनसाठी आपले विचार परखडपणे मांडण्यास सुरुवात केली. जनतेला याची पूर्वकल्पना देण्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन ते वर्तमानपत्रांमधून करत होते. गांधीजींच्या चळवळीवर सर्वात मोठा प्रभाव हा त्यांच्या लेखनशैलीचा असल्याचे या संशोधनामध्ये आढळून आले आहे.

गांधीजींनी विविध मासिकांमधून, साप्ताहिकांमधून आणि वर्तमानपत्रातील विपुल लेखांमधून मांडलेली मते, सखोल अभ्यास, आणि जुलमी सत्तेविरोधात केलेले लेखन हे समाजोपयोगी माध्यम होते. त्याचबरोबर २० शतकातील हा संपूर्ण काळ लोकांचे अज्ञान दूर करण्यासाठी प्रबोधन करणे महत्त्वाचे होते. २० व्या शतकातील नवी धोरणे, प्रथा-परंपरा, नवविचार, जागतिक अभ्यास यासाठी त्यांचे पत्रकारिता हे क्षेत्र एक अतिशय शक्तिशाली माध्यम ठरले आहे. गांधीजींनी व्यापकपणे आणि शोधाच्या प्रचारासाठी पत्रकारिता हे एक महत्त्वाचे साधन बनविले. या संशोधनामध्ये महात्मा गांधीजींनी दिलेल्या लेखाचा आणि मासिकांचा संदर्भ देऊन अभ्यास केला आहे. त्यांचा पत्रकारितेचा सुरुवातीपासूनचा काळ यामध्ये दर्शविला आहे.

**महात्मा गांधी यांचे विचार आणि कार्य**

मोहनदास करमचंद गाधी असे गांधीजींचे संपूर्ण नाव. २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात येथील पोरबंदर या शहरात त्यांचा जन्म झाला. मे १८८३ मध्ये वयाच्या १३ व्या वर्षी कस्तुरबा गांधी यांच्याशी त्यांचा बालविवाह झाला. नोव्हेंबर १८८७ मध्ये मॅट्रिक पूर्ण करुन १८८८ साली ते वकिलीचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले. तेव्हापासून गांधीजींना वृत्तपत्र वाचनाची गोडी आणि लेखन करण्याचीही गोडी निर्माण झाली. त्यानंतर ते एका खटल्यासंदर्भात द. आफ्रिकेत गेले. तेथून त्यांनी सामाजिक जीवनावर परखडपणे मत मांडण्यास सुरुवात केली. भारतात परतल्यानंतर सुरु केलेल्या वेगवेगळया चळवळी आणि सत्याग्रहांमधून त्यांनी ब्रिटिशांच्या जोखडाखाली अडकलेल्या भारताला बाहेर काढण्यासाठी संपूर्ण जीवन व्यतीत केले.

स्वातंत्र्यपूर्व काळात जनतेमध्ये नव चैतन्य उभारणी करण्यासाठी गांधीजींचे विचार हे महत्त्वाचे योगदान ठरले. यासाठी विविध वर्तमानपत्रांचा आधार घेत त्यांनी त्यांचे विचार मांडले. इंडियन ओपिनियन, हरिजन, यंग इंडिया, दैनिक नवजीवन आणि हरिजनसेवक यांसारख्या वृत्तपत्रांमधून गांधीजी एक पत्रकार म्हणून भुमिका मांडताना दिसतात. १९२०-२२ या काळात गांधीजींनी वृत्तपत्रांमधून जे लिखाण केले, ते ब्रिटिश सरकारच्या दृष्टीने राजद्रोहात्मक होते. त्यामुळे त्यांना शिक्षाही झाली. त्यावेळी त्यांना न्यायमूर्तींनी सहा वर्षांची शिक्षा ठोठावली होती. या सर्व बाबींचा आढावा घेतल्यास महात्मा गांधीजींची पत्रकारिता हा विषय स्वातंत्र्याकाळातील महत्त्वाचे योगदान ठरतो.

**महात्मा गांधी : पत्रकार-संपादक आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य**

इंग्लंडमधील शाकाहारी संस्थेचे मुखपत्र 'व्हेजेटेरिअन' यात त्यांना लेखन करण्याची संधी मिळाली. गांधीजींच्या पत्रकारितेच्या क्षेत्राला ही सुरुवात होती. यावेळी पहिल्यांदा गांधीजी 'फ्री-लान्स' पत्रकार बनले होते. त्यानंतर त्यांनी द. आफ्रिकेत झालेल्या अन्यायाला वाचा फोडली. लंडनच्या व्हेजेटेरिअन सोसायटीने त्यांना लिहायला व बोलायला शिकवले. तसेच दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकजीवनाच्या वर्तुळात सापडल्यानंतर स्वत:ला समाजात भेडसवाणाऱ्या प्रश्नांसमोर खंबीरपणे उभे राहणारे पत्रकार बनले. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची भुमिका बजावताना गांधीजींनी अनेक मासिकांमधून, वृत्तपत्रामधून एक पत्रकार व संपादक अशी भुमिका बजावलेली आढळून येते.

१८९० मध्ये ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या विद्यमाने काढलेल्या 'इंडिया' साप्ताहिकाचे गांधीजी हे दक्षिण आफ्रिका, जोहान्सबर्ग, डर्बन येथील बातमीदार म्हणून काम करत. १८९७ मध्ये 'नेटल मर्क्युरी' पत्रात भारताबद्दल त्यांनी लिखाण केले. १८९९ मध्ये बोअर या युद्धाविषयीची एक लेखमाला 'टाईम्स ऑफ इंडिया'मध्ये त्यांनी लिहिली होती.

"इंडियन ओपिनियन' या दक्षिण आफ्रिकेतील साप्ताहिकाचे मुख्य आधारस्तंभ गांधीजी होते. भारतात परतल्यानंतर गांधीजी "यंग इंडिया' साप्ताहिकाचे संपादक बनले. तुरुंगातील व आंदोलन आणि उपोषणात गुंतलेले दिवस सोडले तर ते संपूर्ण वेळ यातील लिखाण करुन जनजागृतीचे काम करत होते. त्यामुळेच त्यांची पत्रकार-संपादक ही भूमिकादेखील त्यांच्या इतर भूमिकांइतकीच महत्त्वपूर्ण आहे.

**गांधीजींचे भारतीय वृत्तपत्रांमधील उल्लेखनीय कार्य**

भारतीय भाषांविषयी गांधीजांना आस्था होती. "इंडियन ओपिनियन'मध्ये त्यांनी इंग्रजीप्रमाणेच गुजराती भाषेमधून विपुल लिखाण केले. भारतात "नवजीवन' हे गुजराती भाषेमधून निघत होते. याशिवाय हरिजन (इंग्रजी), हरिजनबंधू (गुजराती), हरिजनसेवक (हिंदी) अशी विविध भाषांतील नियतकालीके त्यांनी चालविली. एक भाषा म्हणून इंग्रजी शिकण्यास त्यांचा विरोध नव्हता. मात्र शिक्षणाचे विशेषतः प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असणे हे घातक आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. ५ जुलै १९२८ च्या "यंग इंडिया'तील "द कर्स ऑफ फॉरेन मीडियम' या शीर्षकाच्या लेखात त्यांनी ते मांडले आहे.

हिंदुस्थानातील बहुतेक वर्तमानपत्रांची सहानुभूती गांधीजींनी संपादन केली होती. त्यावेळी 'टाईम्स ऑफ इंडिया'त लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी म्हटले होते की, "प्रसिद्धी हेच आमचे एकुलते एक संरक्षणाचे शस्त्र आहे." त्यांनी 'ग्रीन पॅम्प्लेट' नावाची एक पुस्तिका लिहून प्रसिद्ध केली होती. तिला भारतीय वर्तमानपत्रांनी चांगली प्रसिद्धी दिली. पायोनियर, मद्रास स्टँडर्ड, अमृतबझार पत्रिका, स्टेट्समन वगैरे वर्तमानपत्रांनी गांधीजींच्या मुलाखती छापल्या. 'इंग्लिशमन' पत्राचे संपादक सॉन्डर्स यांच्याशी तर त्यांची फारच गट्टी जमली होती, असे गांधीजींनीच आपल्या आत्मचरित्रात स्पष्ट केले आहे.

हिंदी लोकांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्यासाठी 'इंडियन ओपिनियन' हे पत्र काढले होते. त्यानंतर त्यांनी 'यंग इंडिया', 'नवजीवन' आणि 'हरिजन' ही पत्रे सुरू केली. या पत्रांत त्यांनी जाहिराती कधीच घेतल्या नाहीत. ही भारतात चालवलेली त्यांची पत्रे केवळ मतपत्रे होती. १९१८-१९ नंतर त्यांनी स्वतःचे असे कोणतेच पत्र काढले नाही. मात्र त्यानंतरच्या काळात ते 'क्रॉनिकल'सारख्या दैनिकात लेख आणि पत्रे लिहून आपली प्रतिक्रिया देत होते.

७ एप्रिल १९१९ पासून 'सत्याग्रही' या संपादकीय नावाखाली 'सत्याग्रह' नावाचे साप्ताहिक सरकारी परवान्याशिवाय प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. ११ फेब्रुवारी १९३३ रोजी येरवडा तुरुंगात असताना 'हरिजन' हे सुरुवातीला इंग्रजीतून व त्यानंतर हिंदीतून प्रसिद्ध होणारे साप्ताहिक त्यांनी सुरू केले. गांधीजींनंतर यातले कोणतेच पत्र फार काळ चालू शकले नाही. ते संपादक असतानाच हिंदी 'नवजीवन'चा खप कमी झाला होता.

**निष्कर्ष**

महात्मा गांधींच्या पदार्पणाने पत्रकारितेच्या विश्वात नव-चैतन्य आणि उत्साहाचा संचार झाला. गांधीजींचे वर्तमानपत्रातील लिखाण ब्रिटिश सरकारकडून दुर्लक्षित असलेल्या सामान्य जनतेचा आवाज होता. त्यांचा आशीर्वाद आणि सहवास मिळाल्याने पत्रकारिता जगत खळखळून, रोमांचित झाले. त्यांनी परखडपणे मत मांडत आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य जागृत केले, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सत्याग्रह, अहिंसा आणि सत्याचा शोध घेण्यासाठी एक मिशन म्हणून गांधीजींनी अनेक वर्षे पत्रकारितेचा वारसा चालू ठेवला होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात महात्मा गांधीजींच्या विचारांचा आणि लेखनाचा वारसा हे महत्त्वपूर्ण कौशल्य ठरले आहे.

**संदर्भ**

1. Gandhi Heritage Portal - महात्मा गांधीविषयक संबंधिक सर्व वृत्तपत्रांच्या प्रती
2. पब्लिकेशन डिव्हिजन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, दि कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी
3. Journalist Gandhi - Sunil Sharma
4. Mahatma Gandhi The Journalist - S.N. Bhattacharyya
5. Mahatma Gndhi's Warning And Flashes In Harijan - S.Mahadevan
6. गांधींविषयी, गांधी : जीवन आणि कार्य, संपादक किशोर बेडकीहाळ, सेवाग्राम कलेक्टिव आणि साधना प्रकाशन,पुणे